# अर्ज निशाणी ९१ खालील आदेश
# (**CNR MHSI**080004222022)

०१. प्रस्तूत अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०९ सुनिता चंद्रकांत रावराणे यांचे कायदेशीर वारस दाखल करण्यास झाला विलंब माफ करुन वारस दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.०९ हे दि.०८/०८/२०२४ रोजी मयत झाली आहे. प्रतिवादी क्र.०९ यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर आणणे आवश्यक होते. वादी हे ७५ वर्षांचे वयोवृध्द गृहस्थ असून आजारपणामुळे त्यांना प्रवास करणे व कागदपत्रे गोळा करणे शक्य झाले नाही. त्यामुळे, प्रतिवादी क्र.०९ चा मृत्यूदाखला मिळवून तसेच वारसांची माहिती मिळवून वारस मुदतीत रेकॉर्डवर आणण्यास विलंब झाला आहे. सदर वारस रेकॉर्डवर आण्ण्यास वादीने जाणीवपूर्वक टाळाटाळ केलेली नाही. प्रस्तूत प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर येणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. सदर विलंब माफ होऊन न मिळाल्यास वादीचे कायदेशीर न्याय हक्कावर बाधा येऊन त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर करणेबाबत प्रस्तूत वादी यांनी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.०८, १० व ११ यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, सदर अर्ज खोटा व खोडसाळ असून विलंबाला कोणतेही सक्षम व ठोस कारण दिलेले नाही. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी नि.क्र.९४ प्रमाणे आपले म्हणणे दाखल करुन

अर्जास हरकत घेतली आहे. त्यांच्या कथनानुसार, अर्जात नमुद मजकूर खोटा व खोडसाळ आहे, अर्जातील कारणे समर्पक व संयुक्तीक नाहीत. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा. अर्ज मंजूर करण्याचा झाल्यास वादीकडू खर्चाची रक्कम प्रतिवादीस देण्यात यावी.

०३. अर्ज व त्यावरील जबाब तसेच, उभय पक्षाच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद लक्षात घेऊन अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.०९ सुनिता चंद्रकांत रावराणे ही दि.०८/०८/२०२४ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. सदर दावा वादीने दावा मिळकतींचे वाटप व पृथ्थक कब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे, वरील कारणमिमांसेचा सारांश असा की, प्रस्तूत अर्ज नि.क्र.९१ हा मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

**– आदेश –**

०१. निशाणी क्र.९१ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी क्र.०९ चे वारस मुदतीत अभिलेखावर आणणेस झालेला विलंब वादीने प्रतिवादी क्र.२, ३ व ८, १०, ११, यांना रक्कम रु.२००/- खर्च देण्याच्या अटीवर न्यायपुर्ततेकरीता माफ करण्यात येत आहे.

SHUBHAM GOVIND LATURIYA
Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2025.06.26 10:40:14 +0530

स्थळ : वैभववाडी
(शुभम जी. लटुरिया)

दिनांक : २५/०६/२०२५
न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय, वैभववाडी.